पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.०८)**

दिनांक : ०६/१२/२०१९ वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१९ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०६/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.बुर्डे सुवर्णा विकास | **-** | **अध्यक्षा** |
| २) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी | - | सदस्य |
| ३) मा.गोफणे अनुराधा देविदास | - | सदस्या |
| ४) मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ५) मा.फुगे भिमाबाई पोपट | - | सदस्या |
| ६) मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | - | सदस्य |

या शिवाय मा.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, डॉ.अरुण दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, श्री.संदेश खडतरे-उपअभियंता नगररचना, श्री.राजेंद्र शिंदे-उपअभियंता स्थापत्य, श्री.विजय जाधव-उपअभियंता स्थापत्य/उद्यान, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.एस.व्ही.बगाडे-सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.व्ही.एम.ताकवले -क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.ए.व्ही.गुमास्ते-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.निखील फेंडर-क.अ. स्था.उद्यान, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.
मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.७ भोसरी मधील शाळा इमारत व स्वच्छतागृह पाडणेबाबत. |
| विषय क्रमांक २ | मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.३ वडमुखवाडी संतसृष्टी प्रकल्पातील स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व चालविणेकरीता देणेबाबत. |
| विषय क्रमांक ३ | मा.नितीन प्रताप काळजे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.३ चऱ्होली येथील जुने झालेले स्मशानभूमी वेटींग शेड व स्वच्छतागृह पाडणेबाबत. |
| विषय क्रमांक ४ | मा.नितीन प्रताप काळजे यांचा प्रस्ताव |

| | |
|---|---|
| | प्रभाग क्र.३ चऱ्होली/ मोशी येथील विविध चौकामध्ये/ रस्त्याचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्रमांक ५ | मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव<br>चौकाचे नामकरण करणेबाबत. |
| विषय क्रमांक ६ | मा.भिमाबाई पोपट फुगे यांचा प्रस्ताव<br>भोसरी स्मशानभूमी शेजारील विसावा बद्दल. |
| विषय क्रमांक ७ | मा.भिमाबाई पोपट फुगे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.७ भोसरी येथील सँडविक कॉलनी मधील जलनि:सारण नलिका बदलणेबाबत. |
| विषय क्रमांक ८ | मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव<br>इ प्रभाग समिती सदस्यांचा स्वच्छता अभियान राजस्थान अभ्यास दौऱ्यास मान्यता देणेबाबत. दिनांक ३०/०१/२०२० ते ०३/०२/२०२० |
| विषय क्रमांक ९ | मा.अनुराधाताई देविदास गोफणे यांचा प्रस्ताव<br>प्रभाग क्र.५ कै.सखुबाई गवळी उद्यानातील जुने कारंजे पाडणेबाबत. |

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.सागर गवळी                    अनुमोदक: मा.प्रियांका बारसे

कै. सुरदास गायकवाड-माजी नगरसदस्य, कै.एकनाथ बंडू पाटील-कार्यकारी अभियंता विद्युत, कै.प्रतापसिंह सिसोदिया-माजी कार्यकारी अभियंता, कै.विशाल जाधव-फायरमन यांना मा.इ प्रभाग समितीचे वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येऊन सदरची सभा मंगळवार दिनांक १०/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(उपस्थितांना दोन मिनीटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदरची सभा मंगळवार दिनांक १०/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात आल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ १/कावि/ ३६८ /२०१९
दिनांक : २४ /०९ /२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.०८)**
(६ डिसेंबर २०१९ रोजीची तहकुब सभा)

दिनांक : १०/१२/२०१९ वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१९ ची दि. ०६/१२/२०१९ रोजी तहकुब करणेत आलेली मासिक सभा मंगळवार दिनांक १०/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज सभागृह"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.बुर्डे सुवर्णा विकास | - | **अध्यक्षा** |
| २. | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | - | सदस्या |
| ३. | मा.गायकवाड निर्मला मनोज | - | सदस्या |
| ४. | मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी | - | सदस्य |
| ५. | मा.गोफणे अनुराधा देविदास | - | सदस्या |
| ६. | मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ७. | मा.अजित दामोदर गव्हाणे | - | सदस्य |
| ८. | मा.फुगे भिमाबाई पोपट | - | सदस्या |
| ९. | मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | - | सदस्य |

या शिवाय मा.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.सी.काळै – कार्यकारी अभियंता जलनि:सारण, मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संदेश खडतरे-उपअभियंता नगररचना, श्री.राजेंद्र शिंदे-उपअभियंता स्थापत्य, श्री.विजय जाधव-उपअभियंता स्थापत्य/उद्यान, श्री.वहीकर एस.एस.-उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.लांडे बी.पी. उपअभियंता विद्युत, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.साळुंखे जे.जी.- मुख्याध्यापक मा.वि.भोसरी, मा.श्री.सावंत व्ही.एल – मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय लांडेवाडी, अधिक्षक, श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्री.कोंढरे एस.आर-प्रशासन अधिकारी अतिक्रमण, श्री.व्ही.एम.ताकवले -क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.ए.व्ही.गुमास्ते-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.निखील फेंडर-क.अ. स्था.उद्यान, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सुरू करणेस अनुमती दिली.

मागिल सभा दि.०७/०९/२०१९ दि.०४/१०/२०१९ वदि.०१/११/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या सभेची कार्यक्रम पत्रिका क्र.०५,०६,व ०७ चा सभावृतांतकायम करण्यात आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २५ | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे | अनुमोदक | : | मा.सोनाली गव्हाणे |

संदर्भ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०७/०६/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे भोसरी येथील सर्व्हे नं. ६८१/३ सीटीएस नं. ३४०० मधून असणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखड्यानुसार स्पॉट झोनिंग (औद्योगिक/ रहिवाशी) आहे. सदर स्पॉट झोनिंग मधील औद्योगिक व रहिवाशी नागरीकांसाठी दळणवळण तसेच औद्योगिक मालाची ने-आण करणेकामी सदर रस्त्याची तात्काळ आवश्यकता आहे. सदर रस्ता नकाशात अधोरेखित असून सदर रस्ता २०५ अन्वये विकसित झाल्यास महानगरपालिका व नागरिक आणि औद्योगिकरणाची अडचण दूर होणार आहे. सदर रस्ता उत्तरेपासून दक्षिणेकडे अर्धवट स्थितीत असल्याने २०५ अन्वये विकसित करणे क्रमपात्र होईल. त्यामुळे सदर रस्ता महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २६ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य/ शिक्षणमंडळ/ आरोग्य |
| सुचक | : | मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे | अनुमोदक | : | मा.सागर गवळी |

संदर्भ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र. ७ भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालयाची इमारत स्ट्रक्चरल ऑडिट नुसार धोकादायक झालेली आहे. सदर शाळेची पर्यायी व्यवस्था करणेत आलेली आहे. त्यामुळे सदरची धोकादायक इमारत पाडणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ७ मधील मुळे चाळ जेपीनगर येथील मनपाचे स्वच्छतागृह निष्कसित करून त्या ठिकाणी मनपाच्या आरोग्य विभागासाठी खोली उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २७ | विषय क्रमांक | : | ०३ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | आरोग्य |
| सुचक | : | मा. सागर गवळी | अनुमोदक | : | मा. निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र. ३ वडमुखवाडी संतसृष्टी प्रकल्पांतर्गत स्वच्छतागृह नव्याने बांधणेत आलेले आहे. सदर स्वच्छतागृह सद्या चालू असलेल्या कामातून मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचे मार्फत आवश्यक ती सुधारणा करून देखभाल दुरूस्तीसाठी “पैसे द्या व वापरा” या तत्वावर देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २८ | विषय क्रमांक | : | ०४ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य/ आरोग्य |
| सुचक | : | मा. नितीन प्रताप काळजे | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. नितीन प्रताप काळजे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र. ३ चऱ्होली येथे नवीन स्मशानभूमी बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. या पैकी नव्याने बांधलेला दहन शेडचा वापर चालू झालेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी आलेली जुनी बांधकामे उदा. स्वच्छतागृह, स्मशानभूमी, वेटींग शेड पाडणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २९ | विषय क्रमांक | : | ०५ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. नितीन प्रताप काळजे | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. नितीन प्रताप काळजे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र. ३ चऱ्होली /मोशी येथील १) मोशी आळंदी रस्ता येथील डुडूळगाव चौकास “वहिले चौक दत्तनगर, डुडूळगाव” २) चोविसावाडी येथील सर्व्हे नं. ६/१७ चोविसावाडी वाघेश्वर कॉलनी येथे “कै.बबनराव कोंडीबा तापकीर नगर” या प्रमाणे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३० | विषय क्रमांक | : | ०६ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. निर्मला गायकवाड | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे चऱ्होली प्रभाग क्र. ३ मधील पुणे-आळदी रोड ते काळी भिंत पर्यंत २४ मीटर रस्त्यावरील चौकास "कै.महादू श्रीपती तापकीर चौक" असे नामकरण करण्याची मागणी ग्रामस्थांचे वतीने करण्यात आलेने यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३१ | विषय क्रमांक | : | ०७ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. निर्मला गायकवाड | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. भिमाबाई पोपट फुगे यांचे दिनांक ३०/११/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र. ७ भोसरी येथील स्मशानभूमी शेजारी विसावा आहे. विसावा ७ फुट बाय ९ फुट करण्यात येऊन विसाव्याला ग्रेनाईट लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३२ | विषय क्रमांक | : | ०८ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. निर्मला गायकवाड | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. भिमाबाई पोपट फुगे यांचे दिनांक ३०/११/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र. ७ भोसरी सँडविक कॉलनी मध्ये हरी ओम स्विटस समर्थ कॉलनी ते राधानगरी पर्यत असणारी जलनि:सारण नलिका गेल्या ४० वर्षापासून बदलली नाही. वाढती लोकसंख्या लक्षात घेता जास्त व्यासाची नलिका टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३३ | विषय क्रमांक | : | ०९ |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | प्रशासन |
| सुचक | : | मा. निर्मला गायकवाड | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत राजस्थान अभ्यास दौरा दि.३० जानेवारी २०२० ते ३ फेब्रुवारी २०२० या कालावधीत इ प्रभाग समिती सदस्यांकरीता आयोजित करायचा आहे. सदर अभ्यास दौऱ्यामध्ये स्वच्छतेबाबत कचरा विल्हेवाट, शाळांमधील स्वच्छता प्रकल्प, पर्यटन स्थळांवरील स्वच्छता नियोजन इ.बाबत राजस्थान मधील जयपूर, उदयपूर इ.ठिकाणांना भेटी द्यायच्या आहेत. याकामी प्रभाग समिती सदस्य व इ प्रभागातील ४ अधिकारी यांना अभ्यास दौऱ्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. सदरचा विषय कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ३४ | विषय क्रमांक | : | १० |
| दिनांक | : | १०/१२/२०१९ | विभाग | : | स्थापत्य उद्यान |
| सुचक | : | मा. अनुराधाताई गोफणे | अनुमोदक | : | मा. भिमाबाई फुगे |

संदर्भ मा. अनुराधाताई देविदास गोफणे यांचे दिनांक ०६/१२/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.५ येथील कै.सखुबाई गबाजी गवळी उद्यानामध्ये नव्याने रंगीत कारंजे उभारण्यात आले आहे. उद्यानामध्ये असलेले जुने कारंजे खराब झाले असल्याने ते पाडण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ १/कावि/ ४५९/२०१९
दिनांक : २६/१२ /२०१९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२-/सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

| | | |
|---|---|---|
| मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय भोसरी. | - | • विद्यालयाची जुनी इमारत पाडण्यात आली असून पत्र्याच्या १२ खोल्या स्थापत्य विभागामार्फत तयार करून देणेत आलेल्या आहेत. त्यामध्ये वर्ग चालविले जात आहेत. तथापी कार्यालय, स्टाफ रूम, प्रयोगशाळा, संगणक रूम व स्टोर रूम इ. आणखी ६ खोल्या तयार करून देण्यात याव्यात. जेणेकरून साहित्य शिफ्टींग करता येईल. |
| मा.अजित गव्हाणे | - | • आरोग्य कार्यालयाची खोली रिकामी करून शाळेसाठी देण्यात यावी व आरोग्य कार्यालय इतर ठिकाणी स्थलांतरीत करणेत यावे.<br>• भोसरी स्मशानभूमीत बसविलेले विद्यूत युनीट बंद आहे. पर्यावरण विभागात संपर्क केल्यास ते विद्यूत विभागाचे काम आहे असे सांगितले जाते. त्यामुळे संबंधित विभागाने ते दूरस्त करून घ्यावे. |
| मा.निर्मला गायकवाड | - | • दिघी मधील गजानन महाराज नगर मध्ये पाण्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. जुन्या लाईन असलेल्या भागात पाणी येत नाही. एका वेळी एकाच भागात पाणी सोडावे जेणेकरून प्रेशरने पाणी येईल. |
| श्री.वहीकर | - | • ताजणे मळा भागात स्वतंत्र कनेक्शन जोडायचे आहे.<br>• गुरुदत्त कॉलनी मध्ये लाईन टाकायची आहे. त्याचे मोजमाप घेण्यात आले असून संबंधितास दिले आहे. |
| मा.सागर गवळी | - | • नवीन लाईन टाकणेत आलेल्या आहेत परंतु त्यांची जोडणी करण्यात आलेली नाही, ती जोडण्यात यावी व जुन्या लाईन बंद करणेत याव्यात.<br>• रस्त्यावरचे लाईट सकाळी अर्धा तास उशिरा बंद करण्यात यावेत.<br>• ड्रेनेज लाईनची कामे करीत असतांना विद्यूत वायर तुटले किंवा पाणी लाईन खराब झाली तर त्यांची दुरूस्ती तातडीने करणे गरजचे आहे. त्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.<br>• गणेश नगर मध्ये ड्रेनेजचे काम चालू असलेने विद्यूत विभागाची कामे थांबलेली आहेत.<br>• प्रभाग क्र. ३ मध्ये पाणी प्रश्न मार्गी लागलेले नाही. |
| श्री.वहीकर | - | • ३०० मीटर लाईन टाकली आहे त्याची चाचणी घ्यायची आहे. |
| मा.प्रियांका बारसे | - | • सावरकर महादेव नगर मध्ये लोकांना पाणी कमी मिळते. सदरचे ठिकाणी असलेले कनेक्शन वळसा घालून येत असलेने अर्धा तास उशिराने पाणी मिळते. त्यामुळे त्यांना जवळूनच कनेक्शन देण्यात यावे. याबाबत अभियंता यांनी संबंधित प्लंबरसोबत चर्चा करून नियोजन करावे.<br>• आदर्श नगर मध्ये नवी लाईन टाकूनसुध्दा पाणी मिळत नाही.<br>• गणपती मंदिराजवळचे परिसरात सफाई केलेली नाही. कचरा/घाण पडलेली आहे.<br>• ड्रेनेज लाईनचे काम अर्धवट आहे. सदर ठिकाणी असलेले चेंबर मध्ये माती पडलेली आहे, ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झालेनंतरच डांबरीकरण करण्यात यावे. |
| मा.नितीन लांडगे | - | • २४ बाय ७ चे काम करीत असतांना खड्डे बरोबर बुजवले जात नाहीत. ठेकेदार व स्थापत्य विभागाचे कर्मचारी एकमेकांवर आरोप/ तक्रारी करीत आहेत. |
| मा.भिमाबाई फुगे | - | • समर्थ कॉलनी मध्ये काही भागात पाणी येते व काही भागात येत नाही.<br>• गावठाणात गढूळ पाणी येत आसल्याच्या तक्रारी आहेत.<br>• गव्हाणे वस्ती मध्ये पुरांमध्ये तुटलेले नळ कनेक्शनपूर्ववत जोडून देण्यात यावेत.<br>• गावठाणात ड्रेनेज लाईन ४० वर्षे जूनी आहे. सतत चोकअप होत असतात. नवीन |

लाईन टाकण्यात यावी. चोकअप विषयी तक्रारी केल्यास स्टॉर्म वॉटर लाईन व ड्रेनेज लाईनचे संबंधित कर्मचारी एकमेकांवर आरोप करीत असतात.

- रसरंग जवळ गव्हाणे वस्तीमध्ये नवीन लाईन टाकणेत यावी.

श्री.बोरावके - 
- सदरचे पाणी हे ड्रेनेज लाईनचेच आहे आहे परंतु ते स्टॉर्म वॉटर लाईनला जोडलेले आहे. काही ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईनला ड्रेनेजचे कनेक्शन जोडले आहे.

मा.निर्मला गायकवाड - 
- पोलीस स्टेशन समोर विद्यूत पोल टाकण्यास सांगितलेला आहे परंतु अद्याप टाकणेत आलेला नाही.
- पुढील बैठकीस विद्यूत विभागाचे अधिकाऱ्यांना बोलविण्यात यावे.
- गणेशनगर, दूर्गानगर चौकात फुटपाथवर पार्कींग केली जाते. अतिक्रमण विभागाने पाहणी करून कारवाई करावी.

मा.सुवर्णा बुर्डे - 
- वॉर्डामध्ये विद्यूत विभागाची कामे चाललेली आहेत, त्यामुळे कचरा वाहतुकीस अडचण होत आहे. तसेच वॉर्डाचे क्षेत्र मोठे असलेने स्वतंत्र गाडीची व्यवस्था करण्यात यावी.
- गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. चऱ्होली भागात सर्वत्र गढूळ पाणी येते तसेच कमी दाबाने येते. पाण्याच्या टाक्यांची सफाई करून घ्यावी. सर्व भागातील लिकेज तपासून घ्यावेत.
- ड्रेनेज लाईनचे काम करीत असतांना गंधर्व नगरी भागातील पाणी लाईन लिकेज झालेली आहे, ती दूरूस्त करून घ्यावी.

मा.अनुराधाताई गोफणे - 
- माझे प्रभागात पाणी मिळत नाही, जे मिळते ते गढूळ व काळे आहे. धरण भरले आहे तरी पाणी मिळत नाही अशा नागरीकांच्या तक्रारी आहेत. दिवसाआड पाणी द्यावे परंतु भरपूर देण्यात यावे. गढूळ पाण्याचा प्रश्न लवकर मार्गी लावावा.